महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. ३७४(२)/स्थापत्य/२०२०/१९ दिनांक १२ ऑगस्ट, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय**:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२० च्या अंतिम निकालाबाबत.

**संदर्भ**:- जाहिरात क्रमांक ०६/२०२०, दिनांक १८ मार्च, २०२० तसेच आयोगाचे दिनांक १४ जुलै, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक व अधिसूचना क्रमांक ६१/२०२१, दिनांक १३ सप्टेंबर, २०२१ व शुध्दिपत्रक दि. २१ सप्टेंबर, २०२१

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ९ ते १३ मे, २०२२ दिनांक २३ ते २७ मे, २०२२ आणि दिनांक ३० व ३१ मे, २०२२ या कालावधीत पुणे येथे महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२० करीता मुलाखती घेण्यात आलेल्या परीक्षेचा अंतिम निकाल दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण पाच संवर्गातील २१७ पदांपैकी २१५ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे. मूळ अर्ज क्र. ५२५/२०२२ वरील मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार दिव्यांगांसाठी आरक्षित ०२ पदांचा निकाल राखून ठेवण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेमध्ये श्री. कट्टे रोहित शिवाजी, बैठक क्रमांक PN003335 हे राज्यातून सर्वसाधारण प्रवर्गातून प्रथम आले आहेत, श्री. नाईक पवन राजु, बैठक क्रमांक PN001250 हे मागास प्रवर्गातून व श्रीमती कुंजीर किर्ती विठ्ठल, बैठक क्रमांक PN003341 या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गाकरीता शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (cut off marks) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत निकालाधारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व संबंधित शिफारसपात्र उमेदवारांच्या अर्जातील विविध आरक्षणविषयक दाव्यांच्या अनुषंगाने त्यांनी मुलाखतीवेळी सादर केलेल्या प्रमाणपत्रांची वैधता शासनामार्फत सक्षम प्राधिकाऱ्याकडून / निगडित यंत्रणेकडून तपासून शिफारसपात्र उमेदवारांना संबंधित पदावर नियुक्ती देण्यात येईल. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतूदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणांमुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

५. प्रस्तुत परीक्षेचा निकाल मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणामध्ये दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायिक प्रकरणांमधील अंतिम न्यायनिर्णयाच्या तसेच आरक्षणासंदर्भातील प्रकरणपरत्वे शासनाकडून होणाऱ्या कार्यवाहीच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

६. प्रस्तुत अंतिम निकालात शिफारसपात्र ठरलेल्या / न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलवर पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत, आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्रमांक ६.४.४ पहावे)

ठिकाण- मुंबई

उपसचिव, परीक्षोत्तर-राजपत्रित
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई